शपथेवर सरतपास श्री खेळकर विधीज्ञ मार्फत अर्जदारातर्फे :—

०६. शपथपत्र नि.क्र.यु—६ मला दाखविले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर माझया सांगितल्याप्रमाणे खरा व बरोबर आहे. मी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक मर्या., चंद्रपुर येथे काम करीत होतो. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल मला व्यवस्थापक आस्थापना व व्यवस्थापन यांनी माझया सेवा निवृत्ती बाबतचे दिलेल्या पत्राची मुळ प्रतिवरून पडताळणी केलेली प्रत दाखविली. त्यावर माझे नाव नमुद आहे. त्यास नि.क्र.यु—७ देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल मी गैरअर्जदार बॅक यांना दि.०७.०३.२०२० रोजी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक यांना दिलेल्या पत्राची मुळ प्रतीवरून पडताळणी केलेली प्रत दाखविली. त्यावर माझी सही आहे. त्यास नि. क्र.यु—८ देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल मी गैरअर्जदार बॅकेला दि. ०७.०३.२०२० रोजी दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने बॅकेने मला दिलेल्या पत्राची मुळ प्रतीवरून पडताळणी केलेली प्रत दाखविली. त्यावर माझे नाव नमुद असुन त्यावर प्रभारी व्यवस्थापक यांची सही आहे. त्यास नि.क्र.यु—९ देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल दि.३१.१२.२०२० रोजी चा माझा कार्यमुक्ती दाखल्याची मुळ प्रतिवरून पडताळणी केलेली प्रत दाखविली. त्यास नि.क्र.यु—१० देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल मी मुख्य अधिकारी चंद्रपुर मध्यवर्ती सहकारी बॅक यांना दि.०४.०६.२०२१ रोजी वैद्यकिय रजा न उपभोगता बॅकेत रजा काळात काम केल्याबाबत वेतन मिळण्याबाबत दिलेल्या पत्राची स्थायी प्रत दाखविली. त्यास नि. क्र.यु—११ देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल मी माझे अधिवक्ता मार्फत

गैरअर्जदार यांना दि.०२.०८.२०२१ रोजी पाठविलेल्या नोटीस ची माझी प्रत दाखविली. त्यास <u>नि.क्र.यु–१२</u> देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल सदर नोटीस गैरअर्जदार यांना पाठविल्याच्या पोस्टाच्या २ पावती दाखविल्या त्यास <u>नि.क्र.यु–१३</u> देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल सदर नोटीस गैरअर्जदार यांना मिळाल्याच्या २ पोचपावत्या दाखविल्या. त्यास <u>नि.क्र.यु–१४</u> व <u>नि.क्र.यु–१५</u> देण्यात येते.

<u>उलट–तपास करीता पुढील तारीख देण्यात येते.</u>

माझे समक्ष

स्वाक्षरी/–

(श्रीमती रू.वि. मेटे)

चंद्रपुर.
न्यायाधीश

दि.२८.०७.२०२२.
कामगार न्यायालय, चंद्रपुर